# श्री सिद्धेश्वर मंदिर, कायगाव टोका – स्थापत्य शिल्पाचा अभ्यास

**डॉ. शरद उत्तमराव गावंडे**
इतिहास विभाग प्रमुख,
वि. पा. शि. प्र. मं. सं., कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
कन्नड जि. औरंगाबाद

**प्रास्ताविक :–**

औरंगाबादपासून ३० कि. मी. अंतरावर कायगाव या गावाजवळच टोका हे ठिकाण आहे. गोदावरी नदीच्या दक्षिण काठावर हे मंदिर आहे. महाराष्ट्रात मंदिर बांधणीची मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली ती उत्तर चालुक्य व यादवांच्या राज्यात. या काळातील मंदिरांना हेमाडपंती मंदिरे असे संबोधिले जाते. मात्र अनेक मंदिरे उत्तर चालुक्य काळातील आहेत. बांधीव मंदिरे आपल्याला यादवकाळात जास्त प्रमाणात बांधलेली आढळतात. तथापि यादवकाळापर्यंत बांधीव मंदिरेच नव्हती असा त्याचा अर्थ नाही.

महानुभावांच्या स्थानपोथीतून मंदिरांविषयींचे अनेक उल्लेख आलेले आहेत. यावरून मंदिर ही संस्था किती लोकप्रिय होती याचा अंदाज येऊ शकतो. या काळात मंदिर ही प्रधान संस्था बनली असून समाजातील एका वर्गाचा चरितार्थ या उत्पन्नावर चालत असे.[i] महाराष्ट्रात मंदिर उभारण्याचे काम यादवांच्या काळात मोठ्या प्रमाणावर झाले. यादवकालीन हेमाडपंती म्हणून ओळखली जाणारी मंदिरे नंतरच्या काळात निर्माण होऊ लागली. या काळातील मंदिरांच्या द्वारशाखा सुंदर अलंकृत दिसतात. त्यावर गणेशपट्टी सहसा आढळते. डॉ. देगलूरकरांच्या मते, ललाटी गणेश सहसा यादवकाळातील लक्षण आहे.[ii] १३ व्या शतकातील राजकीय परिस्थितीतील बदलामुळे दक्षिणेच्या उत्तर भागातील कलेच्या क्षेत्रात अडथळा निर्माण झाला. या शतकाच्या समाप्तीबरोबर मंदिर स्थापत्यातील मनमोहकता, आकर्षकता नष्ट झाली. मुस्लिम शासकांचा प्रभाव जस जसा वाढत गेला तसा या परिसरातून शिल्पपरंपरांचा लोप होत गेला. या काळात मंदिर स्थापत्यात साधेपणा आला. हेमाडपंत हा रामचंद्र यादवाचा श्रीकरणधिप होता. त्याच्या नावावरून या शैलीला हे नाव पडले. त्याने एका रात्रीत शेकडो मंदिरे बांधली अशी आख्यायिका आहे.[iii] यानंतर या प्रकारच्या मंदिरांना हेमाडपंती मंदिरे म्हणून ओळखले जाते.

**श्री. सिद्धेश्वर मंदिर :—**

गोदावरीच्या दक्षिण काठावर हे प्राकारयुक्त बंदिस्त मंदिर आहे. चोहोबाजुने मजबुत तटबंदी आहे. तटबंदीच्या प्रवेशद्वारातूनच मंदिर परिसरात प्रवेश करता येतो. सर्व बाजुनी १० फूट उंचीची भिंत आहे. तटबंदीला पूर्व व दक्षिण बाजुने दगडी बांधकामाच्या सभामंडपासारखे नक्षीकाम केलेले आहे.आतमध्ये प्रवेश केल्यानंतर मुख्य मंदिराच्या दोन्ही बाजुस दोन मंदिरे आहेत. ही सर्व मंदिरे पूर्वाभिमुखी आहेत. सिद्धेश्वर मंदिराच्या समोरच दगडी नंदीमंडप आहे. त्यामध्ये सुंदर दागिन्यांनी अलंकृत नंदी आहे. अप्रतिम कलाकुसर असलेली झुल नंदीच्या अंगावर आहे. अत्यंत बारीक नक्षीकाम नंदीवर केलेले आहे. नंदीच्या कपाळावर नागप्रतिमा आहे. नंदीमंडपास चार स्तंभ आहेत व चारही बाजुनी नक्षीदार कमानी आहेत.

मंदिराचा सभामंडप अर्धमंडप प्रकारातील आहे. नंदीमंडपासमोरून सभामंडपात प्रवेश करताना दोन्ही बाजुला द्वारपाल आहेत. मुख्य मंदिराचा सभामंडप ३० X २६ फूट आहे. या सभामंडपात एकुण १२ स्तंभ आहेत. संभामंडपावर घुमटाकार कळस आहे. चारही कोपऱ्यात आतून त्रिकोण तयार झालेले आहेत. या मंदिरास बंदिस्त अंतराळ आहे. अंतराळात प्रवेश करण्यासाठी २.११ X ५.८ फूटाचे प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वारावर गणेश प्रतिमा आहे. अंतराळाच्या प्रवेशद्वाराच्या खाली दोन कीर्तिमुखे आहेत. या प्रवेशद्वाराला द्वारशाखा आहेत. अंतराळ ३० X ७ फूट आहे. अंतराळाच्या वरच्या बाजुला छताला सुंदर नक्षीकाम आहे. गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या द्वारशाखा साधारण आहेत. गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर गणेश प्रतिमा आहे. गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या खाली दोन कीर्तिमुखे आहेत. गर्भगृहाचे प्रवेशद्वार २.११ X ५.८ फूट आहे. गर्भगृहाच्या दक्षिण बाजुलाही प्रवेशद्वार आहे. गर्भगृहात प्रवेश केल्यानंतर डाव्या व उजव्या बाजुला देवकोष्ठ आहेत. उत्तरेकडून मधोमध व पश्चिमेकडून कमानदार देवकोष्ठ आहे. गर्भगृहाच्या नक्षीकामात १२ स्तंभ कोरलेले आहेत. गर्भगृहाच्या आतून कळसाकडे गोलाकार नक्षी आहे. गर्भगृह १९ X १९ फूट आहे.

सभामंडपाच्या बाहेरील बाजुने सुंदर नक्षी व दृश्य, प्रतिमा कोरलेल्या आहेत. या मंदिरावर चारही बाजुंनी मूर्ती कोरलेल्या आहेत. दक्षिण बाजुस शिवमूर्ती आहे तर पश्चिमेस सरस्वती आहे. सरस्वतीच्या खाली देवकोष्ठात गणेशमूर्ती आहे. उत्तरेकडील देवकोष्ठ रिकामे आहे. उत्तरेकडून गोमुखातून गर्भगृहातील अभिषेकाचे पाणी बाहेर पडते. मुख्य मंदिराच्या प्रवेशद्वारासमोरच्या संरक्षक भिंतीच्या वर दुसरा मजला आहे. जिन्यातून या मजल्यावर जाऊन मंदिराचे पूर्व बाजुने सौंदर्य न्याहाळता येते. मुख्य मंदिराच्या परिसराला पूर्वेकडून बाहेर पडण्यासाठी दरवाजा आहे.

मंदिराच्या बाहेरून चार कॉर्नर तयार झालेले आहेत. कॉर्नरवर कळस आहेत. असे एकुण सहा कळस व एक मुख्य कळस आहे. मुख्य कळसाखाली चारही बाजुने चेहरे आहेत. कळसाकडील भागावर सुंदर नक्षीकाम व फुले कोरलेली आहेत. चारही बाजुला हत्ती प्रतिमा आहे. मुख्य मंदिराच्या कळसाच्या खाली चेहऱ्याच्या सुमारास चार दिशेला (आग्नेय, वायव्य, नैऋत्य, ईशान्य) तोंड केलेले हत्ती आहेत.

या मंदिराची शैली पाहता व येथील मूर्तिशिल्पावरून हे उत्तर यादवकालीन मंदिर असावे.

**सिद्धेश्वर मंदिराशेजारील – दक्षिणेकडील लहान मंदिर :–**

सिद्धेश्वर मंदिराच्या उत्तर व दक्षिण बाजुला लागुनच दोन लहान मंदिरे आहेत. त्यापैकी दक्षिणेकडील लहान मंदिरही कलाकुसर असलेले आहे. ते मुख्य मंदिरापेक्षा आकाराने लहान आहे. या मंदिराचा सभामंडप १२ X ८ फूट आहे. मंदिराच्या अंतराळात दोन शिलालेख आहेत. परंतु ते घासले गेल्यामुळे वाचता येत नाहीत. अंतराळात दोन्ही बाजुला ४ X ३.६ फूटाचे देवकोष्ठ आहेत. गर्भगृहाचे प्रवेशद्वार ४.६ X २ फूट आहे. या प्रवेशद्वाराला सुंदर नक्षीकाम असलेल्या द्वारशाखा आहेत. या मंदिराच्या गर्भगृहात छोट्याशा मंदिराची प्रतिकृती आहे. गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या वर गणेश प्रतिमा आहे.

या मंदिरावर बाहेरून कळसापर्यंत सुंदर नक्षीकाम आहे. बाहेरून खाली व मध्यभागी दोन ठिकाणी देवकोष्ठ आहेत. कळसाच्या चारही बाजुला प्राण्याची प्रतिमा आहे. कळसाच्या खाली चारही बाजुला मानवी चेहरा कोरलेला आहे. कळसाशेजारी ध्वज रोवण्यासाठी दगडी सांधा तयार केलेला आहे. इतके सुक्ष्म नियोजन या मंदिराच्या निर्मितीच्या वेळी करण्यात आलेले दिसते. या मंदिराच्या कळसाकडील बाजुला तीन बाजुंनी वाघसदृश्य प्राणी आहेत तर पुढच्या बाजुला हत्ती आहे. या मंदिराच्या कळसाच्या आत जाण्यासाठी पायऱ्या आहेत.

**सिद्धेश्वर मंदिराशेजारील – उत्तरेकडील लहान मंदिर :–**

सिद्धेश्वर मंदिराच्या उत्तर व दक्षिण बाजुला लागुनच दोन लहान मंदिरे आहेत. त्यापैकी उत्तरेकडील मंदिर २.८ फूट उंचीच्या चौथऱ्यावर आहे. समोरची बाजु उघडी असलेला छोटा सभामंडप आहे. संभामंडप २० X ७.६ फूट आहे. या सभामंडपात चार देवकोष्ठ आहेत. चारही देवकोष्ठांवर सुंदर नक्षीकाम आहे. सभामंडपाच्या छताचे तीन भागात तीन कप्पे केलेले आहेत. आतून नक्षीकाम नाही. अंतराळ ४.८ X ४.८ फूट आहे. अंतराळात देवकोष्ठ नाहीत. या मंदिराच्या गर्भगृहाचा दरवाजा १.११ X ४.७ फूट आहे. दोन्ही लहान मंदिरांच्या द्वारशाखा सारख्या आहेत. गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या वर गणेश प्रतिमा आहे. या मंदिराच्या समोरच याच उंचीचा मोठा ओटा आहे. या ओट्यावर अलीकडील काळातील मूर्ती ठेवलेली आहे.

## सिद्धेश्वर मंदिर येथील शिल्प :—

### १) सिद्धेश्वर मंदिराच्या सभामंडपाच्या दक्षिणेकडील बाजुच्या शिल्पपटावरील शिल्पांकन :—

कायगाव टोका येथील सिद्धेश्वर मंदिराच्या सभामंडपाच्या दक्षिणेकडील बाहेरच्या बाजुला सुंदर शिल्पांकन केलेले आहे. त्या शिल्पांकनात उजवीकडून डावीकडे या क्रमाने शिल्पांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो. प्रथम नृत्यगणेश मूर्ती आहे. या मूर्तिस शेंदूर लावलेला आहे. परशु, कमळ, अंकुश आणि मोदक घेतलेला, घागऱ्या असलेली नुपुरे, मुकुट असा नटलेला हा गणेश नृत्य करत आहे. शिवाप्रमाणेच गणेशही नृत्यनिपुण होता. त्याने शंकरपार्वतीसमोर नृत्य करून डोक्यावरचा चंद्र, इतर आभुषणे व सर्व गणांचे आधिपत्य मिळविले होते.[iv] विघ्नांचा नाश करून मांगल्याची स्थापना करणारा देव म्हणून संपूर्ण भारतात गणेशाला महत्त्वाचे स्थान आहे. पितृकार्य सोडून इतर प्रत्येक कार्याचा आरंभ करताना गणेशाचे आवाहन, नमन, पूजन अत्यावश्यक समजले जाते. 'कार्याचा श्रीगणेशा' अशा प्रकारचा उल्लेख मराठी भाषेत अनेकदा वापरला जातो. या मूर्तीच्या शेजारी नृत्य करणाऱ्या दोन स्त्री प्रतिमा, विणा वादन करणारी स्त्री प्रतिमा, आपल्या केसांचा आंबाडा लोंबकळत बदकाच्या तोंडात केसांचा जुडगा देणारी स्त्री प्रतिमा, एक पुरुष प्रतिमा व धनुष्य बाण सिंह सदृश्य प्राण्यावर रोखून धरणारी स्त्री प्रतिमा आहे. त्यानंतर लहान बालक आपल्या कडेवर घेणारी स्त्री, घागरी डोक्यावर घेणाऱ्या तीन स्त्रिया, अजून एक स्त्री प्रतिमा व पुन्हा शेवटी मूषकारूढ गणेश प्रतिमा आहे. या शिल्पपटावर सुरुवातीला व शेवटी गणेश प्रतिमा आहे.

### २) सिद्धेश्वर मंदिराच्या सभामंडपाच्या उतरेकडील बाजुच्या शिल्पपटावरील शिल्पांकन :—

या मंदिराच्या सभामंडपाच्या उत्तर बाजुनेही सुंदर शिल्पपट आहे. सभामंडपाला जी अर्धभिंत आहे त्या भिंतीच्या बाहेरच्या बाजुला हा शिल्पपट आहे. या शिल्पपटात डावीकडून उजवीकडे असा क्रम धरल्यास पुढीलप्रमाणे शिल्प आहेत. या शिल्पाच्या सुरुवातीलाही गणेश प्रतिमा आहे. गणेश स्थानक स्थितीत असून येथे गणेशाच्या हातात आयुधं नाहीत. गणेशाच्या पायाजवळ दोन पायांवर उभा मूषक दाखविलेला आहे. यानंतर योगासनात बसलेला एक योगी दाखविला आहे. आपला उजवा हात नाकाला लावून योगक्रिया करत आहे. या योग्याच्या डाव्या हातात जपमाळ आहे. केसांच्या जटा वाढलेल्या असून दाढी दाखविलेली आहे. गळ्यात माळ आहे. यानंतर शिवपार्वतीचे शिल्प असून शेजारी नंदी असलेला दाखविला आहे. यापुढे माकड आणि नंतरच्या शिल्पात धनुर्धारी आहे. पुढच्या शिल्पात हनुमानाने पर्वत उचलून आणला आहे, असे दृश्य शिल्पांकित केले आहे. त्यावरून रामायणकालीन प्रसंग दाखविणारे हे शिल्प असावे. पुढच्या शिल्पात योगी एका पायावर उभा असलेला दाखविला आहे. हा योगी नग्न अवस्थेत असून त्याने आपला उजवा पाय आणि उजवा हात वर उचललेला आहे. त्याच्या डाव्या हातात कमंडलु आहे. जटा, दाढी व मिशा वाढलेल्या असून गळ्यात हार आहे. पुढे वृक्षावर काही प्रतिमा नंतर एक स्त्री—पुरुष प्रतिमा व नंतर घागरीमध्ये रवी टाकून एक स्त्री रवीने बहुधा दह्याला घुसळून लोणी

काढण्याची प्रक्रिया करत आहे. घागरीच्या खाली वेटोळे असलेली चुंभळ टाकलेली आहे. या स्त्री प्रतिमेच्या जवळ एक बालक या स्त्रीसोबत खेळत आहे. शेवटी गणेशाचे पूजन दाखविले आहे. गणेश आसनावर बसून आपले पाय खाली सोडलेले आहेत. आसनाच्या शेजारी खाली मूषक आहे. गणेश द्विभुज असून डाव्या हातात मोदकाची वाटी तर उजव्या हातात बहुधा काहीतरी आयुध असावे. डावा पाय लोंबकळलेला असून उजवा पाय थोडासा वर तोलून धरला आहे. या पायात एक स्त्री पायात काहीतरी बांधत आहे असे वाटते. स्त्री मूर्तिचा उजवा हात तुटलेला असल्यामुळे बारकावा लक्षात येत नाही. दक्षिण बाजुच्या शिल्पपटाप्रमाणेच या शिल्पपटावरील शिल्पांची सुरुवात गणेश प्रतिमेने व शेवटही गणेश प्रतिमेने झालेला आहे.

**३) सिद्धेश्वर मंदिराच्या गर्भगृहाच्या उत्तरेकडील बाहेरून असलेल्या भिंतीवरील शिल्पांकन:—**

या मंदिराच्या डाव्या बाजुला गर्भगृहाच्या भिंतीच्या बाहेरच्या उत्तरेकडील बाजुला सुंदर अशा मंदिराचे शिल्प कोरलेले आहे. मंदिराला शिखर, कळस आणि छोटा सभामंडप दाखविलेला आहे. मंदिराच्या सभामंडपात सिंह सदृश्य प्राणी आहे. बहुधा हे देवीचे मंदिर दाखविले असावे. मंदिराच्या समोर अंबारी असलेला हत्ती दाखविला आहे. अंबारीत दोन स्त्रिया बसलेल्या असून अंबारीच्या समोर माहुत बसलेला आहे. त्याच्या हातात अंकुश आहे. हत्ती बसलेल्या स्थितीत असून तो मंदिराच्या समोर बसला आहे. त्याच्यासमोर उंच काठी घेतलेला माणूस उभा असलेला दाखविला आहे. या मंदिराचे शिल्पांकन आखीव—रेखीव असून मंदिराच्या शेजारीही शिल्पांकन केले आहे.

**४) सिद्धेश्वर मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करताना उजव्या हाताला असलेला शिल्पपट:—**

सिद्धेश्वर मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करताना उजव्या बाजुला शिल्पपट आहे. या शिल्पपटाचा डावीकडून उजवीकडे असा विचार करता पुढीलप्रमाणे शिल्प कोरलेले आहेत. सभामंडपात प्रवेश करताना उजव्या हाताला प्रथम एक अष्टभूजा धनुर्धारी दाखविला आहे. त्याच्या हातात धनुष्य व इतर आयुधे आहेत. त्यांनतर दहा मुख व दहा हात असलेला रावण दाखविलेला आहे. या शिल्पपटातील पहिला धनुर्धारी हा राम असावा. रावणासमोर राम, लक्ष्मण असे दोन धनुर्धारी असून हनुमानही दाखविलेला आहे. यानंतर एक शिल्प असून त्यानंतर तीन प्रतिमा असलेले शिल्प आहे. यातील मधोमध पुरुष प्रतिमा असून उजव्या बाजुला पुरुष व डाव्या बाजुला स्त्री प्रतिमा आहे. या तीनही प्रतिमा योगासनात बसलेल्या आहेत. हात योगमुद्रेत आहेत. मधील प्रतिमा चतुर्भूज असून इतर दोन प्रतिमा द्विभुज आहेत. मधल्या प्रतिमेचे मस्तक तुटलेले आहे. बहुधा रामायणकालीन हे शिल्पपट असल्यामुळे हे राम, लक्ष्मण व सीता असावे. यानंतर शेवटचे शिल्प हे घोड्याचे आहे. यज्ञ करण्याआधी रामाचा घोडा लवकुशाने अडविला होता, असा उल्लेख रामायणात येतो. घोड्यावर एक छत्र, अंगावर झूल असून घोड्याचा लगाम एका पुरुषाच्या हातात आहे. हा संपूर्ण शिल्पपट रामायणातील प्रसंगांवर आधारलेला आहे.

**५) सिद्धेश्वर मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करताना डाव्या हाताला असलेला शिल्पपट :—**

**१. मत्स्य अवतार :—** सिद्धेश्वर मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करताना डाव्या हाताला शिल्पपट असून या शिल्पपटात बरेच प्रसंग कोरलेले अहेत. मत्स्य अवतार, कूर्म अवतार, वराह अवतार, नरसिंह अवतार अशा क्रमाने या शिल्पपटात डावीकडून उजवीकडे प्रसंग कोरलेले आहेत. सुंदर असे कोरीव काम येथे आहे.

मत्स्य म्हणजे विष्णुने माशाच्या स्वरूपात घेतलेला अवतार. वैदिक वाङ्मयात मत्स्य हे प्रजापतीचे रूप होते व सृष्टीच्या विकासासाठी प्रजापतीने ते धारण केले असे म्हटले आहे. पौराणिक कल्पना वेगळी आहे. हयग्रीव किंवा शंख या नावाच्या असुराने हैदोस घातला. त्याने ब्रह्मदेवाकडचे चार वेद चोरले. ते घेऊन तो समुद्रात गेला. ते चोरलेले वेद परत मिळवायचे म्हणून विष्णूने मत्स्यरूप घेतले. शंखासुराला मारले व त्याच्याकडचे वेद परत आणले व ब्रह्मदेवास परत केले.[v] मत्स्यावताराची प्रतिमा दोन प्रकारची आढळते. पहिली प्रतिमा केवळ मत्स्यरूप असते. दुसरी प्रतिमा खालचे अंग मत्स्यरूपात व वरचा भाग चतुर्भुज विष्णूरूपात आढळतो. यापैकी दुसऱ्या प्रकारची मूर्ती सिद्धेश्वर मंदिरावर कोरलेली आहे.

विष्णुच्या दहा अवतारांचे अंकन स्वतंत्र मूर्ती किंवा पाठशिळेवर केले जात असे. मत्स्य अवताराचे अंकन साध्या माशाच्या रूपामध्ये किंवा पाठीवर चार मानवमूर्ती किंवा मानव मस्तके असलेल्या मत्स्याच्या रूपात करतात. चार मानव म्हणजे मत्स्याने वर आणलेल्या चार वेदांचे प्रतिक होय. क्वचित मत्स्याच्या पाठीवर शिवलिंग ही दिसते.[अप] मत्स्यावताराच्या स्वतंत्र प्रतिमा देखील असत. त्याचे प्रकार खालीलप्रमाणे आढळतात[vii] —

१. पद्मासनात विष्णु, चरणशिळेवर मासा
२. कमललतेवर असलेला, पाठीवर चार मानवमुखे धारण करणारा मासा
३. शंख, चक्र, गदा व पद्म यांच्या भोवताल वेटोळ्या असलेल्या कल्पलतेवर मोठा मासा

येथील मत्स्यावताराच्या शिल्पात विष्णुच्या कमरेखालचा भाग माशाचा असून ऊर्ध्वांग चतुर्भूज चक्र, गदा व शंख धारण करणारे आहे

**२. कूर्म अवतार :—** सिद्धेश्वर मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करताना डाव्या हाताला असलेल्या शिल्पपटात कूर्म अवताराचा प्रसंग कोरलेला आहे.

विष्णुच्या कूर्म अवताराचे तीन प्रकार दिसतात[viii]

१. साधे कासव
२. समुद्रमंथनाचे दृश्य, कासवाच्या पाठीवर वेढलेला मंदराचल, बाजूला देव—दानव म्हणून दोन पुरुष. क्वचित कासवाच्या पाठीवर मंदराचलासमोर पृथ्वी ही दिसते. या कूर्मप्रतीक दृश्याला

अपराजितमृच्छेत 'मंदरोन्मथन' असे म्हटले आहे.

३. वरीलप्रमाणेच दुसरा प्रकार पण मंदार ऐवजी ब्रह्मसूत्र असलेले शिवलिंग दिसते. या परंपरेला विशिष्ट अर्थ होता की हे मूर्तिकाराच्या अज्ञानाने घेतलेले वळण होते हे सांगता येत नाही.

येथे नागफणाधिष्ठित कासवाच्या पाठीवर मेरूची रवी असून त्यावर विष्णु दाखविलेला आहे. रवीस वासुकीच्या दोरीने वेढले असून देव व दानव तिचे एक एक टोक धरून घुसळीत आहेत. भागवत पुराणाने कूर्मावताराचा संबंध समुद्रमंथनाच्या कथेशी जोडला आहे. त्या मंथनप्रसंगी विष्णुने कूर्मरूप घेऊन मंदराचलीची रवी आपल्या पाठीवर तोलुन धरली असे सांगितले.[ix]

**३. वराह अवतार :—** सिद्धेश्वर मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करताना डाव्या हाताला असलेल्या शिल्पपटात वराह अवतार प्रतिमा कोरलेली आहे. या मूर्तित विष्णुचे मुख वराहाचे आहे.

**४. नरसिंह अवतार :—** या मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करताना वर उल्लेख केल्याप्रमाणे असलेल्या शिल्पपटात नरसिंह अवताराचा प्रसंग कोरलेला आहे. हिरण्यकशिपूला आपल्या मांडीवर घेऊन त्याचे पोट फाडणारा नरसिंह येथे दाखविला आहे.

अशाप्रकारे अत्यंत समृद्ध अशी शिल्पकला या मंदिरावर आहे. या मंदिराविषयी आख्यायिका सांगितली जाते. मारीच राक्षसाने सीतेचे अपहरण केले होते. प्रभु रामचंद्र सीतेला शोधत होते. त्यांनी मारीच राक्षसाला शोधून काढले व त्याचा वध केला. त्याचे अवयव विखुरले गेले. गोदावरी नदीच्या पलीकडे मारीच राक्षसाचे डोके पडले होते म्हणून त्या ठिकाणास टोका हे पडले. तेथे सिद्धेश्वर मंदिर आहे. ज्या ठिकाणी त्याचा घोटा पडला होता. तेथे घटेश्वर मंदिर आहे. ही सर्व मंदिरे गोदावरी नदीच्या पलीकडच्या काठावर आहेत. थोड्या अंतरावर बरगड पडली होती त्या ठिकाणी बगडी हे गाव आहे. गोदावरीच्या उत्तरेकडील बाजुस म्हणजेच कायगाव येथे काळीज पडले होते. काळीज म्हणजे काया म्हणून कायगाव हे नाव पडले. रामाने येथे शिवलिंग स्थापन केले म्हणून रामेश्वर नाव आहे अशी आख्यायिका सांगितली जाते.

डॉ. गो. ब. देगलुरकर यांनी महाराष्ट्रातील मंदिरांचे पुढीलप्रमाणे तीन गट केले आहेत[x]

**गट १ :—** तेर येथील मंदिरे आहेत.

**गट २ :—** चालुक्य मंदिरे आहेत.

**गट ३ :—**यादवकाळातील मंदिरे—या गटाचे वर्ग १,२ आणि ३ अशा तीन वर्गात विभाजन केले आहे. यातील दुसऱ्या गटात या मंदिराचा समावेश करता येईल. डॉ. प्रभाकर देव यांनी मराठवाड्यातील मंदिरांचे दोन गटात विभाजन केले आहे. पहिल्या गटात सुरुवातीच्या काळातील आकर्षक स्थापत्य व शिल्प असलेली

मध्ययुगीन मंदिरे आहेत. ही मंदिरे चालुक्य शैलीची आहेत. पहिल्या गटात इ.स. १००० ते इ.स. १२०० या काळातील मंदिरे येतात.[गण] परंतु हे मंदिर नंतरच्या काळातील आहे.

**निष्कर्ष :—**

सिद्धेश्वर मंदिरावरील कलाकुसर अत्यंत सुंदर आहे. दोन लहान मंदिरे या मंदिराला लागुनच आहेत. परंतु ती वेगवेगळी आहेत. बंदिस्त प्राकारात हे मंदिर असून रामायणकालीन दृश्ये जास्त प्रमाणात कोरलेली आहेत. लालसर दगडात बांधलेले हे मदिर चांगल्या स्थितीत आहे. या परिसरात रामेश्वर मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, घटेश्वर मंदिर, बगडी येथील मंदिर, मुक्तेश्वर मंदिर अशी मंदिर श्रृंखला आहे. वर उल्लेख केलेली आख्यायिका या मंदिरांचा एकमेकांशी संबंध दर्शविते. हे मंदिर उत्तर यादव काळातील आहे.

---

**संदर्भ :—**

[i] पाठक अरुणचंद्र शं., स्थानपोथी : एक पुरातत्वीय अभ्यास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, २०१३, पृष्ठ क्र. १३३.

[ii] देगलूरकर गो. ब., मराठवाड्यातील मंदिरे व शिल्पे, म.सं.मं. वार्षिक, १९७५, पृ. २२.

[iii] Deo Prabhakar, The Temples of Marathwada, Publication Scheme, Jaipur, 1993, P. 81.

[iv] जोशी नी. पु., भारतीय मूर्तिशास्त्र, प्रसाद प्रकाशन, पुणे, द्वितिय आवृत्ती, २०१३, पृ. ३४२.

[v] जोशी पं. महादेवशास्त्री, भारताची मूर्तिकला, अनमोल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८०,पृ. ६७.

[vi] जोशी नी. पु., भारतीय मूर्तिशास्त्र, पुणे, द्वितिय आवृत्ती, २०१३, पृ. १२१.

[vii] जोशी नी. पु., भारतीय मूर्तिशास्त्र, पुणे, द्वितिय आवृत्ती, २०१३, पृ. १२१.

[viii] जोशी नी. पु., भारतीय मूर्तिशास्त्र, पुणे, द्वितिय आवृत्ती, २०१३, पृ. १२२.

[ix] जोशी पं. महादेवशास्त्री, भारताची मूर्तिकला, पुणे, प्रथमावृत्ती, १९८०, पृ. ६७.

[x] Deglurkar G. B., Temple Architecture and Sculpture of Maharashtra, Registrar, Nagpur University, First Edition, Nagpur, 1974, P. 5.

[xi] Deo Prabhakar, The Temples of Marathwada, Jaipur, 1993, P. 32.